सायं.दैनिक

# बीड किसान

www.beedkisan.in

• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ३०२ ▪ गुरुवार, दि. १२ मार्च, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १३ मार्च, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-302 ▪ Thursday 12 March, 2026 ▪ Postal Date 13 March, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## गेवराई नगर पालिकेत बाचाबाची

गेवराई (किसान न्युज): गेवराई नगरपरिषद कार्यालयात गुरुवारी (दि.१२ मार्च) अचानक झालेल्या बाचाबाचीमुळे काही काळ मोठा गोंधळ उडाल्याची घटना समोर आली आहे. जागेच्या वादातून ही बाचाबाची झाल्याची प्राथमिक माहिती असून या घटनेमुळे कार्यालयातील दैनंदिन कामकाज काही वेळ ठप्प झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, नगरपरिषद कार्यालयात नेहमीप्रमाणे कामकाज सुरू असताना जागेच्या मुद्द्यावरून स्थानिक नागरिक कुटे हे थेट मुख्याधिकारी यांच्या दालनात गेले. यावेळी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांच्याशी चर्चा सुरू असताना अचानक दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. हा वाद काही क्षणातच तीव्र होत बाचाबाचीपर्यंत पोहोचला. साक्षीदारांच्या माहितीनुसार, शाब्दिक वाद वाढताच कुटे यांनी मुख्याधिकारी यांच्या अंगावर धाव घेतल्याने कार्यालयात एकच खळबळ उडाली. उपस्थित कर्मचाऱ्यांनी आणि नागरिकांनी तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, शासकीय कार्यालयात गोंधळ घालणे व कामकाजात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गेवराई पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची खात्रीलायक माहिती समोर येत आहे. घटनेनंतर काही काळ कार्यालयातील वातावरण तणावपूर्ण झाले होते. या घटनेमुळे नगरपरिषद कार्यालयातील सुरक्षेचा प्रश्नही पुन्हा एकदा चर्चेत आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# राजाभाऊ फड तोंडघशी पडले; स्व.महादेव मुंडेंच्या पत्नी म्हणाल्या आमचं धनंजय मुंडेवर पहिल्या पासून डाऊट नाहीच

## राजाभाऊ फड चुकलेच त्यांनी धनंजय मुंडेंचं नाव घेतलं : ज्ञानेश्वरी मुंडे

### कराडच्या मुलावर केला थेट आरोप





परळी । किसान न्युज

येथील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणाने गती घेतली आहे. याप्रकरणी अनेकांच्या ब्रेन मॅपिंग सारख्या चाचण्या झाल्या आहेत. यानंतर तपास करणाऱ्या एसआयटी चे प्रमुख आयपीएस पंकज कुमावत यांनी मयत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांची भेट घेतली. तब्बल तीन तास त्यांच्यामध्ये चर्चा झाली आहे. यानंतर ज्ञानेश्वरी मुंडे मुंडे यांनी याप्रकरणी आ. धनंजय मुंडे यांचा संबंध नसल्याचे स्पष्ट शब्दात सांगितले आहे. यामुळे या प्रकारणाच्या आडून आ. धनंजय मुंडे यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा डाव फसला असून एक प्रकारे बदनामीचा षडयंत्र रचणाऱ्यांना ही चपराक असल्याची चर्चा सुरू झाली आहे. तसेच आ. मुंडे यांना क्लिनचीट देताना मात्र ज्ञानेश्वरी मुंडे यांनी वाल्मीक कराडच्या मुलांवर मात्र थेट आरोप केला आहे.

२०२३ च्या ऑक्टोबर महिन्यातील २० तारखेला सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास महादेव मुंडे आपल्या मुलांना ट्युशनवरून सोडून घरी परतत असताना आर्ध्यावाटेत बेपत्ता झाले. आझाद चौक पासून ३०० मीटर अंतरावर असलेल्या वनविभागाच्या कार्यालयासमोर त्यांची मोटरसायकल रात्री ९ वाजता आढळून आली. ती गाडी पोलिसांनी पोलीस स्टेशनला आणून लावली आणि याच गाडीवर रक्त देखील सांडलेले होते अशी कुटुंबीयांनी माहिती दिली. दुसऱ्या दिवशी सकाळी जिथे मोटरसायकल सापडली त्यापासून ५० मीटर अंतरावरच महादेव मुंडे यांचा मृतदेह सापडला. या प्रकरणी त्यांच्या बंधूंच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशा तऱ्हेने महादेव मुंडे यांच्या हत्येला तीन वर्षांचा काळ लोटला असून एसआयटी या प्रकरणाचा तपास करत आहे. मात्र, इतका तपास करूनही पोलिसांच्या हाती अद्याप काहीच लागलेले नाही, अशी खंत ज्ञानेश्वरी मुंडे यांनी व्यक्त केली. न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या मुंडे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली. त्या पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. दुसरीकडे तपासाला ही वेग आला असून पंकज कुमावत असून तपास करीत आहे. याप्रकरणी काही जणांच्या विविध चाचण्या झाल्या आहेत. यानंतर पंकज कुमावत यांनी मयत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यामध्ये तब्बल तीन तास चर्चा झाली. यामुळे याप्रकरणी पोलिसांच्या हाती काही » पान २ वर

# न.राजुरी ते खरवंडी राष्ट्रीय महामार्ग प्रश्नी आ.संदीप क्षीरसागर आक्रमक

## रस्ता पूर्ण होणार तरी कधी असा प्रश्न उपस्थित केला

बीड । किसान न्युज

**राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ खरवंडी ते नवगन राजुरी रस्त्यासंबधि लक्षवेधी मुद्दा उपस्थित करीत या रस्त्याचे काम मागील अनेक वर्षांपासून रखडले आहे. हा रस्ता पूर्ण होणार की, नाही ?रस्त्याचे झालेले काम निकृष्ट दर्जाचे असून याची आयआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी करीत या रस्त्यावरुन आ. संदीप क्षीरसागर आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले आहे.**

### छ.संभाजी महाराज पुतळ्याची उंची वाढवून सुशोभीकरण करा

**बीड शहरापासून जाणाऱ्या बायपास रस्त्यावरील महालक्ष्मी चौकात छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळ्याची उंची वाढवून येथील सुशोभीकरण करण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी याच लक्षवेधी मांडताना केली. याला ही सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.**



राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ चे काम पूर्ण करण्याचा कालावधी हा १८ महिन्यांचा होता. मात्र ९ वर्ष झाले तरी हा रस्ता अपूर्ण असून, आजही २५ टक्के काम राहिलेले आहे. तसेच या रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला ६० टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम देण्यात आली आहे. काम रखडण्याचे कारण कोरोना आणि भूसंपादन असल्याचे सांगितले जात आहे. पण कोरोना काळ हा दोन वर्षांचा होता, तर १० टक्के भूसंपादन राहिले आहे. राष्ट्रीय महामार्गाची वर्क ऑर्डर निघण्याआधी पूर्ण होत असते तरीही यात हलगर्जीपणा झाला आहे. १० टक्के भूसंपादन ९ वर्षात पूर्ण करु न शकणारे अधिकारी, कर्मचारी याला कारणीभूत असल्याचे सांगितले आहे. तसेच अनेकांच्या जमिनी घेतल्या मात्र त्याचा मोबदला ही मिळाला नसल्याचे आ. क्षीरसागर यांनी म्हटले आहे. » पान २ वर

# जिल्हा नशा मुक्त करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे पाऊल पुढे

## अंमली पदार्थ कार्यकारी समितीची बैठक पडली पार

बीड । किसान न्युज

**जिल्हा हा नशा अन् व्यसन मुक्त करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी काम सुरू केले आहे. याचे पहिले पाऊल म्हणून आज जिल्हाधिकारी यांनी अंमली पदार्थ कार्यकारी समितीची बैठक घेतली आहे. यामध्ये सर्व विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी त्यांना शाळा महाविद्यालय येथे जनजागृती करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**




कुठल्याही गुन्हेगारी मागे व्यसनाधीनता हे ही एक प्रमुख कारण ठरताना दिसतो यामुळे गुन्हेगारी कमी करायची असेल तर आधी व्यसनाधीनता आणि अवैध धंदे बंद होणे गरजेचे आहे. बीड जिल्ह्याचा विचार केला तर येथे विविध प्रकारचे नशेचे प्रकार समोर आले आहेत. यामध्ये अनेक अल्पवयीन मुले ही बळी पडले आहेत. तसेच अनेक तरुणांचे आयुष्य बर्बाद झाले आहेत. हे फक्त नशा गांजा, दारु किंवा प्रचलित अंमली पदार्थांचाच नव्हे तर यामध्ये खोकल्याचे औषध, गुंगी आणणारे औषध, गोळया, सुलेचन, व्हाइटनर, फेव्हीक्युक यासह आदी पदार्थांचे व्यसन करण्यात येत असल्याची धक्कादायक बाब समोर आलेली आहे. गुन्हेगारी आटोक्यात आणण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे प्रयत्न सुरू आहेत. तर आता बीड जिल्हा नशा मुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पावले उचलली आहेत. यासाठी आज गुरुवारी जिल्हाधिकारी यांनी अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक घेतली आहे. या बैठकीत अंमली पदार्थ विरोधी नशेच्या गोळ्या, सिरप औषधी, बोगस डॉक्टर, शासकीय रुग्णालयातील » पान २ वर

## युवकावर धारधार शास्त्राने वार

# गाडीला कट मारण्याच्या कारणाने दोन गटात वाद



बीड । किसान न्युज

बीड शहरातील अंबिका चौक येथे दि.११ रोजी रात्री १०.३० च्या सुमारास तू आमच्या गाडीला कट का मारला असे म्हणत एका युवकास काही तरुणांनी बेदम मारहाण केली याची माहिती मिळताच दुसऱ्या गटातील काही जण घटनास्थळी दाखल झाले व वाद सुरू वाढल्याने दोन्ही गटाने एक मेकावर दगड फेक केली या दगडफेकित अनेक जणांना मार लागला असून गाडीला कट मारल्याच्या कारणावरुन दोन गटात मोठा वाद झाल्याची घटना बुधवारी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली. दोन्ही गटाकडून एकमेकांच्या दिशेने दगडांचा मारा झाला असून काही जण जखमी देखील जख्मी ना उपचारा साठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्या वर उपचार सुरू आहेत सदरील घटनेनंतर रात्री उशिरा शिवाजी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्या साठी मोठी गर्दी झाली होती या प्रकरणात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता.

# बीड शहर पोलिसांचा जुगार अड्ड्यावर छापा; दहा जणांवर गुन्हा दाखल

बीड । किसान न्युज

बीड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत किल्ला मैदान परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकत दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल फोन व पत्त्यांचा संच असा एकूण २ लाख १८ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस ठाणे बीड शहर येथे पोलीस कर्मचारी नवनाथ गहिनीनाथ राख (वय ३१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. १२ मार्च रोजी दुपारी सुमारे १.१५ वाजण्याच्या सुमारास किल्ला मैदान परिसरातील जोशी यांच्या वाड्यातील मोकळ्या जागेत काहीजण बेकायदेशीररीत्या तिरट नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून आरोपींना रंगेहात पकडले. या प्रकरणात आतिश बाबुराव अंधारे, राहुल शशिकांत जोशी, महेश सर्जेराव करांडे, वैभव नवनाथ काळे, सौरभ दुर्गादास जोशी, ओमकार कृष्णा क्षिरसागर, राजू प्रदीप भोसले, कृष्णा दत्तात्रय राऊत, आदेश यादव गायकवाड आणि आविनाश कैलास कांबळे (सर्व रा. बीड) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपींकडून जुगारासाठी वापरले जाणारे पत्ते, रोख रक्कम तसेच विविध कंपन्यांचे मोबाईल फोन असा एकूण २ लाख १८ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारावाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार, पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहर पोलिसांनी केली आहे. गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस हवालदार सय्यद शहेनशाह करत आहे.

# बालेपीर येथे चहा गाड्याची तोडफोड झाली किमान त्याची फिर्याद तरी घ्या



बीड । किसान न्युज

बीड शहरातील बालेपीर परिसरात एका गरीब चहा विक्रेत्यावर मारहाण करून त्याचा चहाचा गाडा फोडल्याची घटना घडली असून, संबंधित प्रकरणात पोलिसांकडून फिर्याद नोंदविण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप पीडिताने केला आहे. त्यामुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बालेपीर येथे शेख अकबर रहीम हा सामान्य कुटुंबातील व्यक्ती चहाचा छोटा व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करत आहे. रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर रोजा सोडल्यानंतर रात्रीच्या वेळी तो नेहमीप्रमाणे आपला चहाचा गाडा चालवत होता. याच दरम्यान एक इसम तेथे येऊन त्याने अकबर यांच्या खिशातील पैसे जबरदस्तीने घेतल्याचे सांगितले जाते. त्यानंतर त्या व्यक्तीने अकबर यांना मारहाण करत शिवीगाळ केली आणि संतापाच्या भरात चहाचा गाडा ढकलून देत तोडफोड केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतर पीडित शेख अकबर रहीम यांनी शिवाजीनगर पोलिस » पान २ वर




स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड

9850643058

सोने २४ कॅरेट 159,500

२२ कॅरेट 154,000

चांदी प्रतिकिलो 270,000

## दिव्यांगांनी अनुदान सुरक्षिततेसाठी

# युडीआयडी ला ई-आधार कार्ड संलग्न करून घ्यावे : जे.डी.शाह



बीड । किसान न्युज

जिल्ह्यातील दिव्यांग अपंग बांधवांनी शासकीय वाढीव अनुदान रुपये अडीच हजार रुपये पदरात पाडून घेण्यासाठी तहसील कार्यालयात आपले कागद पत्रांतील तुरटी दुरुस्ती करून ही ज्यांना अद्याप पर्यंत वाढीव अनुदान मिळाले नाही अशा दिव्यांगांनी तात्काळ आपल्या जवळच्या तहसील कार्यालयात जाऊन आपले युडीआयडी कार्डाला ऑनलाईन टक्केवारी प्रमाणपत्र तसेच ई-आधार कार्ड संलग्न करून घ्यावे न केल्यास वाढीव अनुदान मिळणार नाही असे आवाहन समाजसेवक जे.डी.शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. पत्रात पुढे म्हटले आहे की संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग पेन्शन योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी युडीआयडी ला ई-आधार कार्ड संलग्न अनिवार्यपणे आवश्यक असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शासनाच्या २७ जून २०२४ च्या निर्देशानुसार दिव्यांग लाभार्थ्यांची नोंदणी आणि पडताळणी करण्यासाठी युडीआयडी ला ई- आधार कार्ड संलग्न करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे » पान २ वर

# अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा पकडला

## साडे अठरा लाखाचा मुद्देमाल जप्त

गेवराई । किसान न्युज

अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा पोलिसांनी पकडला असून साडेअठरा लाख रुपयांचा रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई बुधवारी पहाटे करण्यात आली. पोलीस ठाणे गेवराई येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक हिमांशु नागरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, गुप्त माहितीच्या आधारे पोलिस पथकाने बुधवारी पहाटे सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास संभाजी



चौकाजवळील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वरील झमझम पेट्रोल पंप परिसरात नाकाबंदी केली होती.यावेळी बीडकडे » पान २ वर

# चकलांबा ठाण्याची जबाबदारी सचिन इंगळेंच्या खांद्यावर



बीड । किसान न्युज

चकलांबा पोलीस ठाण्याची जबाबदारी पोलीस अधीक्षक यांनी निर्मळ आणि कर्तव्यदक्ष अशी ओळख असलेले एपीआय सचिन इंगळे यांच्या खांद्यावर सोपवली आहे. यामुळे या ठाण्याला चांगला अधिकारी मिळाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाणे सध्या लाचलुचपत प्रतिबंधक कारवाईच्या घटनेने राज्यात चर्चेत आला आहे. यामुळे पोलीस दलाची लक्तरे वेशीला टांगली गेली आहेत. या घटनेमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे पॅचअप करण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी चांगले पाऊल उचलले आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून काम करीत असलेले एपीआय सचिन इंगळे यांच्या कार्याची दखल घेऊन त्याच्यातील प्रमाणीकपणाची दखल घेऊन चकलांबा पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्ती केली. यामुळे चकलांबा पोलीस ठाण्याला चांगला आणि प्रामाणिक व कर्तव्यदक्ष अधिकारी मिळाला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. इंगळे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.